आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 17/01/२०२६

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 39 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# भाजपचे पिंपरी-चिंचवडमध्ये वर्चस्व

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक 2026 मध्ये भारतीय जनता पक्षाने मोठे यश संपादन करत शहराच्या राजकारणावर आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. 32 प्रभागांपैकी बहुतांश प्रभागांमध्ये भाजपचे उमेदवार निवडून आले असून अनेक ठिकाणी पूर्ण पॅनल भाजपचा विजयी झाला आहे.

प्रभाग क्रमांक 2, 3, 4, 6, 10, 11, 15, 19, 25, 26, 29 यांसारख्या प्रभागांमध्ये भाजपने एकतर्फी विजय मिळवत मतदारांचा विश्वास कायम ठेवला आहे.

ॲड. विनायक गायकवाड, संदीप कस्पटे, शत्रुघ्न काटे, कुंदा भिसे, राहुल कलाटे, मनिषा पवार, तान्हाजी बारणे, रविना अंघोळकर यांसारख्या नावाजलेल्या उमेदवारांच्या विजयामुळे भाजपची ताकद अधिक मजबूत झाली आहे. भाजपच्या या यशामागे संघटनात्मक ताकद, आक्रमक प्रचार, विकासाचा मुद्दा आणि नेतृत्वावर असलेला मतदारांचा विश्वास कारणीभूत ठरल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या निकालामुळे महापालिकेतील सत्तास्थापना भाजपच्या नेतृत्वाखाली होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.






## राष्ट्रवादी काँग्रेसचा भक्कम प्रतिकार
## काही प्रभागांत संपूर्ण पॅनल
## प्रभावी विरोधकाची भूमिका निश्चित

भाजपच्या आघाडीसमोरही राष्ट्रवादी काँग्रेसने आपली ताकद टिकवून ठेवत काही प्रभागांमध्ये जोरदार यश मिळवले आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक 9, 20 आणि 21 मध्ये राष्ट्रवादीने संपूर्ण पॅनल निवडून आणत संघटनात्मक ताकद दाखवून दिली आहे.

सिद्धार्थ बनसोडे, वैशाली घोडेकर, जितेंद्र ननावरे, वर्षा जगताप, निकिता कदम, संदीप वाघेरे यांसारख्या उमेदवारांनी स्पष्ट बहुमताने विजय मिळवला.

तसेच अनेक मिश्र प्रभागांमध्ये राष्ट्रवादीचे उमेदवार निवडून येत भाजपच्या वर्चस्वाला मर्यादा घालण्यात यशस्वी ठरले आहेत.

ग्रामीण व निमशहरी भागात राष्ट्रवादीचा प्रभाव अजूनही कायम असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

या निकालानंतर महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस प्रभावी विरोधक म्हणून भूमिका बजावणार, अशी चर्चा राजकीय

## शिवसेनेची मर्यादित पण लक्षवेधी
## कामगिरी निवडक प्रभागांत विजय
## शहरात अस्तित्व कायम

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक 2026 मध्ये शिवसेनेने मर्यादित जागांवर निवडणूक लढवत काही ठिकाणी महत्त्वाचे विजय मिळवले आहेत.

प्रभाग क्रमांक 16 आणि 24 मध्ये शिवसेनेच्या उमेदवारांनी यश मिळवत पक्षाचे अस्तित्व कायम ठेवले आहे. रेश्मा कातळे, ऐश्वर्या तरस, निलेश तरस, विश्वजीत बारणे आणि निलेश बारणे यांच्या विजयामुळे शिवसेनेला महापालिकेत प्रतिनिधित्व मिळाले आहे. विशेषतः प्रभाग 16 मधील निकालाने स्थानिक पातळीवर शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीची झलक पाहायला मिळाली. जरी अपेक्षित यश मिळाले नसले तरी शिवसेना आगामी काळात भाजप आणि राष्ट्रवादी यांच्यातील राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
आधुनिक शहरातील घडामोडी
शनिवार दिनांक 17/01/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# भाऊसाहेब भोईर यांचा करिष्मा कायम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने शहरावर आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसले तरी प्रभाग क्रमांक 17 मध्ये मात्र राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांचा प्रभाव ठळकपणे दिसून आला.**




प्रभाग क्रमांक 17 मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे चार उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यापैकी भाऊसाहेब भोईर आणि शेखर चिंचवडे हे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. तर शोभा वाल्हेकर आणि मनीषा अडसूळ यांना पराभव स्वीकारावा लागला. या प्रभागात भाजपचे माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांचा भाऊसाहेब भोईर यांनी दणदणीत पराभव केला.

निवडणूक प्रचारादरम्यान भाऊसाहेब भोईर यांनी "टायगर अभी जिंदा है" असा संदेश देत आक्रमक आणि प्रभावी प्रचार केला होता. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळेच हा विजय शक्य झाल्याचे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

भाऊसाहेब भोईर हे यापूर्वी पाच वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी दोन वेळा विधानसभेची निवडणूकही लढवली असून, जरी त्यात यश मिळाले नसले तरी त्यांच्या दीर्घ राजकीय व सामाजिक कार्यामुळे शहरात त्यांची ज्येष्ठ नेते म्हणून ओळख आहे.

याच अनुभवावर आणि विश्वासार्हतेवर यंदाच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 17 मधील मतदारांनी शिक्कामोर्तब केले आहे.निवडणूक प्रचारापूर्वी भाजपचे नेते शेखर चिंचवडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता आणि त्यांना उमेदवारी देण्यात आली होती.

त्यांच्या प्रचाराची जबाबदारी भाऊसाहेब भोईर यांनी स्वतः सांभाळली आणि त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून शेखर चिंचवडे यांनाही विजय मिळाला.

या विजयाबद्दल बोलताना भाऊसाहेब भोईर यांनी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी आपल्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त केले. प्रभाग क्रमांक 17 मध्ये मिळालेल्या या यशामुळे राष्ट्रवादीसाठी हा निकाल दिलासादायक ठरला असून भाऊसाहेब भोईर यांचे नेतृत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# पिंपरी चिंचवड शहराच्या राजकारणात जगतापांचा करिष्मा कायम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहराच्या राजकारणामध्ये जगताप कुटुंबीयांचा करिष्मा कायम असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. 2017 मध्ये लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी चिंचवडमध्ये परिवर्तन घडवले. पिंपरी चिंचवडकरांच्या स्वाभिमानावर शहरांमध्ये भाजपची निर्विवाद सत्ता आणली. तोच करिष्मा 2026 मध्ये देखील पहायला मिळाला. यंदाच्या निवडणुका निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. यामध्ये देखील भाजपने निर्विवाद सत्ता मिळवत पिंपरी चिंचवड मध्ये कमळ फुलवले.**



पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 पार पडली. 16 जानेवारी रोजी या निवडणुकांचा निकाल घोषित करण्यात आला. यामध्ये भाजप 85, राष्ट्रवादी काँग्रेस 37, जागांवर तर शिवसेनेने 5 जागांवर विजय मिळवला. यापूर्वीच्या सर्व महापालिका निवडणुका या लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. 2023 मध्ये लक्ष्मणभाऊ जगताप यांचे निधन झाले. लक्ष्मणभाऊ जगताप यांचा या पूर्ण शहरावर ' होल्ड' होता. त्यांच्या एकहाती मार्गदर्शनाखाली या शहरातल्या निवडणुका यशस्वीरित्या पार पाडल्या जायच्या. तेच संघटन तोच करिष्मा पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 चिंचवड मतदार संघाचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून त्यांच्यावर पिंपरी चिंचवडची कमान सोपवण्यात आली होती. या संधीचे सोने करत शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवड शहरांमध्ये भाजपची निर्विवाद सत्ता खेचून आणली आहे. एकीकडे आरोपांचे रान उठवत राष्ट्रवादी काँग्रेसने विरोध केलेला असताना भाजपने आपला यशाचा "ग्राफ" कायम राखला आहे. यामध्ये शंकर जगताप यांच्या संघटन आणि नियोजनाची चुणूक दिसून आली. चिंचवड मतदार संघातून 39 जागांवर भाजपने विजय संपादित केला. अनुक्रमे भोसरीमध्ये 35 तर पिंपरी मध्ये 12 जागांवर भाजपने विजय मिळवला आहे.

> "लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या निधनानंतर ही पहिलीच महापालिका निवडणूक होती. यामध्ये लक्ष्मण भाऊ जगताप यांची उणीव नक्कीच आम्हाला होती. मात्र त्यांनी दिलेले विचार आणि शहराचा विकास हेच अंतिम ध्येय मानून आम्ही काम केले. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीचा विजय सुज्ञ मतदारांचा विजय आहे विकासाला विरोधाची झालर चढवण्याचा प्रयत्न झाला मात्र मतदारांनी तो खोडून काढला. मतदारांना शहराच्या विकासाचे महत्त्व समजलेले आहेत."
>
> शंकर पांडुरंग जगताप आमदार : चिंचवड विधानसभा

# भाजपचा दबदबा

## अनेक प्रभागांत पूर्ण पॅनलसह विजय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीचा निकाल अनेकांच्या अपेक्षेपेक्षा वेगळाच लागला असून प्रचाराच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मोठी आघाडी घेतल्याचे चित्र दिसत होते. मात्र प्रत्यक्ष निकालात भारतीय जनता पक्षाने संपूर्ण शहरात आपले वर्चस्व सिद्ध करत “भाजप हाच पिंपरी-चिंचवडमधील सर्वात मोठा पक्ष” असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये भाजप तसेच राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी पूर्ण पॅनल निवडून आणले असले, तरी भाजपने अधिक प्रभागांत वर्चस्व मिळवत स्पष्ट आघाडी घेतली आहे.

### भाजपचे पूर्ण पॅनल विजयी झालेले प्रभाग

**प्रभाग क्रमांक 2**

सुजाता बोराटे, सारिका बोराडे, राहुल जाधव, निखिल बोराडे – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 3**

सारिका गायकवाड, नितीन आप्पा काळजे, अर्चना सस्ते, सचिन तापकीर – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 4**

श्रुती डोळस, कृष्णा सुरकुले, हिराबाई घुले, उदय गायकवाड – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 6**

रेखा देवकर, रवी लांडगे, राजश्री लांडगे, योगेश लांडगे – (भाजप)

(रवी लांडगे हे यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते)

**प्रभाग क्रमांक 10**

अनुराधा बोडके, कुशागर कदम, सुप्रिया चांदगुडे, तुषार हिंगे – (भाजप)

(सुप्रिया चांदगुडे बिनविरोध निवडून आलेल्या)

**प्रभाग क्रमांक 11**

कुंदन गायकवाड, रिटा सानप, योगिता नागरगोजे, निलेश नेवाळे – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 15**

राजू मिसाळ, शैलजा मोरे, शर्मिला बाबर, अमित गावडे – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 19**

मधुरा शिंदे, शीतल शिंदे, जयश्री गावडे, मंदार देशपांडे – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 25**

राहुल कलाटे, कुणाल बावळकर, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 26**

विनायक गायकवाड, आरती चौधरी, स्नेहा कलाटे, संदीप कस्पटे – (भाजप)

**प्रभाग क्रमांक 29**

रवीना अंघोळकर, शकुंतला दराडे, शशिकांत कदम, श्याम जगताप – (भाजप)

### राष्ट्रवादी काँग्रेसचे पूर्ण पॅनल विजयी झालेले प्रभाग

**प्रभाग क्रमांक 9**

सिद्धार्थ बनसोडे, वैशाली घोडेकर, सारिका मासुळकर, राहुल भोसले – (राष्ट्रवादी)

**प्रभाग क्रमांक 20**

जितेंद्र ननावरे, वर्षा जगताप, मनीषा लांडे, योगेश बहल – (राष्ट्रवादी)

**प्रभाग क्रमांक 21**

निकिता कदम, संदीप वाघेरे, प्रियंका कुदळे

एकंदरीत पाहता, वरील प्रभागांमध्ये भाजपने सर्वाधिक प्रभागांत पूर्ण पॅनलसह विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले, तर राष्ट्रवादी काँग्रेसला मोजक्याच प्रभागांमध्ये पूर्ण पॅनल मिळवता आले. या निकालामुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपची पकड अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
आधुनिक शहरातील घडामोडी
शनिवार दिनांक 17/01/२०२६
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- 2026

# विजयी उमेदवारांची यादी

**प्रभाग- 1**
1. विकास साने – राष्ट्रवादी
2. सोनम मोरे – भाजप
3. संगीता ताम्हाणे – राष्ट्रवादी
4. यश साने – राष्ट्रवादी

**प्रभाग- 2**
1. सुजाता बोराटे – भाजप
2. सारिका बोऱ्हाडे – भाजप
3. राहुल जाधव – भाजप
4. निखिल बोऱ्हाडे – भाजप

**प्रभाग- 3**
1. गायकवाड सारिका – भाजप
2. नितीन काळजे – भाजप
3. अर्चना सस्ते – भाजप
4. सचिन तापकीर – भाजप

**प्रभाग क्रमांक- 4**
1. श्रुती डोळस – भाजप
2. कृष्णा सुरकुले – भाजप
3. हिराबाई घुले – भाजप
4. उदय गायकवाड – भाजप

**प्रभाग क्रमांक- 5**
1. भीमाबाई फुगे – राष्ट्रवादी
2. सागर गवळी – भाजप
3. कविता भोंगाळे – भाजप
4. जालिंदर शिंदे – भाजप

**प्रभाग क्रमांक : 6**
1. देवकर रेखा देवराम – भाजप
2. लांडगे रवी – भाजप
3. लांडगे राजश्री – भाजप
4. लांडगे योगेश – भाजप

**प्रभाग क्रमांक : 7**
1. विराज लांडे, राष्ट्रवादी
2. सोनाली गव्हाणे, भाजप
3. राणी पठारे, भाजप
4. नितीन लांडगे , भाजप

**प्रभाग क्रमांक- 8**
1. कांबळे सुहास – भाजप
2. लोंढे नम्रता – भाजप
3. वाबळे अश्विनी – राष्ट्रवादी
4. सहाणे तुषार – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक- 9**
1. सिद्धार्थ बनसोडे – राष्ट्रवादी
2. वैशाली घोडेकर – राष्ट्रवादी
3. सारिका मासुळकर – राष्ट्रवादी
4. राहुल भोसले – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक-10**
1. अनुराधा गोरखे – भाजप
2. कुशाग्र कदम – भाजप
3. सुप्रिया चांदगुडे – भाजप
4. तुषार हिंगे – भाजप

**प्रभाग क्रमांक-11**
1. गायकवाड कुंदन – भाजप
2. रिटा सानप – भाजप
3. योगिता नागरगोजे – भाजप
4. निलेश नेवाळे – भाजप

**प्रभाग क्रमांक-12**
1. भालेकर प्रवीण – भाजप
2. शीतल वर्णेकर – भाजप
3. शिवानी नरळे – भाजप
4. पंकज भालेकर – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक-13**
1. बाप्पू घोलप – भाजप
2. अर्चना कारंडे – भाजप
3. सुलभा उबाळे – शिवसेना
4. उत्तम केंदळे – भाजप

**प्रभाग क्रमांक- 14**
1. कैलास कुटे – भाजप
2. वैशाली काळभोर – राष्ट्रवादी
3. लंगोटे अरुणा – राष्ट्रवादी
4. प्रमोद कुटे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक- 15**
1. राजू मिसाळ – भाजप
2. मोरे शैलजा – भाजप
3. शर्मिला बाबर – भाजप
4. अमित गावडे – भाजप

**प्रभाग क्रमांक- 16**
1. तंतरपाळे धर्मपाल – भाजप
2. ऐश्वर्या तरस – शिवसेना
3. रेश्मा कातळे – शिवसेना
4. निलेश तरस – शिवसेना

**प्रभाग क्रमांक- 17**
1. आशा सूर्यवंशी,भाजप
2. भाऊसाहेब भोईर,राष्ट्रवादी काँग्रेस
3. पल्लवी वाल्हेकर,भाजप
4. शेखर चिंचवडे,राष्ट्रवादी काँग्रेस

**प्रभाग क्रमांक-18**
1. अपर्णा डोके, भाजप
2. मनिषा चिंचवडे, भाजप
3. अनंत कोऱ्हाळे, राष्ट्रवादी
4. सुरेश भोईर, भाजप

**प्रभाग क्रमांक-19**
1. मधुरा शिंदे – भाजप
2. श्री. शितल शिंदे – भाजप
3. जयश्री गावडे – भाजप
4. मंदार देशपांडे – भाजप

**प्रभाग क्रमांक-20**
1. जितेंद्र ननावरे – राष्ट्रवादी
2. वर्षा जगताप – राष्ट्रवादी
3. मनिषा लांडे – राष्ट्रवादी
4. योगेश बहल – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक-21**
1. निकिता कदम – राष्ट्रवादी
2. संदीप वाघेरे – राष्ट्रवादी
3. प्रियंका कुदळे – राष्ट्रवादी
4. डब्बू असवानी – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक-22**
1. नीता पाडळे,भाजप
2. कोमल काळे,भाजप
3. विनोद नढे,भाजप
4. संतोष कोकणे,राष्ट्रवादी काँग्रेस

**प्रभाग क्रमांक- 23**
1. मनिषा पवार – भाजप
2. तानाजी बारणे – भाजप
3. बारणे योगिता – राष्ट्रवादी
4. अभिषेक बारणे – भाजप

**प्रभाग क्रमांक- 24**
1. विश्वजीत बारणे – शिवसेना
2. शालिनी गुजर – अपक्ष
3. माया बारणे – राष्ट्रवादी
4. निलेश बारणे – शिवसेना

**प्रभाग क्रमांक-25**
1. राहुल कलाटे ( भाजप )
2. कुणाल व्हावळकर
3. रेश्मा भुजबळ ( भाजप )
4. श्रुती वाकडकर ( भाजप )

**प्रभाग क्रमांक- 26**
1. ॲड. विनायक गायकवाड – भाजपा
2. आरती सुरेश चौंधे – भाजपा
3. स्नेहा रणजीत कलाटे – भाजपा
4. संदीप अरुण कस्पटे – भाजपा

**प्रभाग क्रमांक- 27**
1. बाबासाहेब त्रिभुवन – भाजप
2. सविता खुळे – भाजप
3. अर्चना तापकीर – भाजप
4. सागर कोकणे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक- 28**
1. शत्रुघ्न सिताराम काटे – भाजप
2. अनिता संदीप काटे – भाजप
3. कुंदा संजय भिसे – भाजप
4. विठ्ठल उर्फ नाना काटे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक- 29**
1. रविना अंघोळकर – भाजप
2. शकुंतला दराडे – भाजप
3. शशिकांत कदम – भाजप
4. शाम जगताप – भाजप

**प्रभाग क्रमांक- 30**
1. राजू बनसोडे – राष्ट्रवादी
2. प्रतीक्षा लांघी जवळकर – राष्ट्रवादी
3. स्वाती उर्फ माई काटे – राष्ट्रवादी
4. संजय काटे – भाजप

**प्रभाग क्रमांक- 31**
1. दीप्ती कांबळे – राष्ट्रवादी
2. ज्ञानेश्वर जगताप – भाजप
3. पल्लवी जगताप – भाजप
4. नवनाथ जगताप – भाजप

**प्रभाग क्रमांक- 32**
1. तृप्ती कांबळे – भाजप
2. हर्षल ढोरे – भाजप
3. उज्वला ढोरे – राष्ट्रवादी
4. प्रशांत शितोळे – भाजप

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968